80

**N.C.R.B (एन.सी.आर.बी)**

**I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)**

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** पिंपरी-चिंचवड **P.S.(ठाणे):** भोसरी एम.आय.डी.सी. **Year (वर्ष):** 2021

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0028 **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 12/01/2021 00:09 बजे

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7(a) |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** सोमवार
**Time Period (कालावधी):** पहर 6
**Date From (दिनांक पासून):** 11/01/2021
**Date To ( दिनांक पर्यंत):** 11/01/2021
**Time From (वेळेपासून):** 16:37 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 16:37 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 11/01/2021 **Time (वेळ):** 23:00 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ**
**Entry No. (नोंद क्र.):** 058 **Date & Time (दिनांक आणि वेळ):** 11/01/2021 23:44 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):** उत्तर, 3 किमी
**Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** उप प्रादेशिक परिवहन कार्यालय,म, मोशी प्राधिकरण,पिंपरी चिंचवडजव,प्रिविया बिल्डींगच्या समोर,मोश

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** निलेश वसंत माटे

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1984 (d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):** **Date of Issue (दिल्याची तारीख):**
**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)**
ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No.(अ. | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

(h) **Address (पत्ता):**

| S.No.(अ. क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | सव्र्हे नं13 वैष्णवी अपार्टम,प्लट नं 7, तपोधाम सोसायटी,वारजे,तालुका- हवेली जिल्हा- प, भोसरी एम.आय.डी.सी.,पिंपरी-चिंचवड,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | सव्र्हे नं13 वैष्णवी अपार्टम,प्लट नं 7, तपोधाम सोसायटी,वारजे,तालुका- हवेली जिल्हा- प, भोसरी एम.आय.डी.सी.,पिंपरी-चिंचवड,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):** **Mobile (मोबाइल नं.):**

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | अक्षय मारुती माळवे | | | 1. पळशी,तामाण,जिसातारा ,भोसरी एम. आय.डी.सी.,पिंपरी-चिंचवड,महाराष्ट्र, भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. मध्ये)) |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | भारतीय चलनातील 100 रु च्या 13 नोटा | 1,300.00 |

10 **Total value of property (In Rs/-)**-(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)): 1,300.00

11 **Inquest Report / U.D. case No., if any** (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| S.No. (अ. क्र.) | UIDB Number (यु.आय.डी. बी.क्र.) |
|---|---|

12 **First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):

फिर्याद दिनांक :- 11/01/2021 मी निलेश वसंत माटे वय 37 वर्षे धंदा ड्रायव्हर,पुणे महानगरपालिका परिवहन महामंडळ,पुणे राठी सव्र्हे नं. 13 वैष्णवी अपार्टमेन्ट प्लट नं 7, तपोधाम सोसायटी वारजे,तालुका- हवेली जिल्हा- पुणे 58 वर नमुद पत्यावर मी कुटुंबासह राहण्यास असुन मी ड्रायव्हर पदावर पुणे महानगरपालिका परिवहन महामंडळ,पुणे येथे कन्ट्रक्ट बेसवर नेमणुकीस आहे. मी दिनांक 07/01/2021 रोजी पोलीस निरीक्षक श्री.सुनिल बिले लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,पुणे यांना समक्ष भेटुन माझी तक्रार सांगितली ती पुढील प्रमाणे- मी वरील प्रमाणे असुन वरील नमुद ठिकाणी राहण्यास आहे. माझे मित्र श्री निलेश विठठल चौधरी यांनी दि.02/12/2020 रोजी जुनी टोयोटा कंपनीची कम्रीकार एम एच 14 ए व्ही 6189 ही फिनोलेक्स केबल लिमिटेड कंपनीकडुन खरेदी केली आहे. संबंधीत कार ही श्री निलेश विठठल चौधरी यांच्या नावावर करणेकामी श्री निलेश विठठल चौधरी यांना जाणे जमत नसल्याने, त्याबाबतचे कामकाज करण्यासाठी मला प्रतिनिधीत्व दिले आहे. त्यानुसार मी दिनांक 25/12/2020 रोजी उप प्रादेशिक परिवहन कार्यालय,मोशी प्राधिकरण,पिंपरी चिंचवड पुणे येथे संबंधीत गाडीचे पेपर घेवून गेलो असता. सदर ठिकाणी मला बसु व धनराज कांबळे तसेच खाजगी इसम एजंन्ट अक्षय भेटला. त्यानी माझ्याकामाबाबत विचारणा केली व आरटीओ कार्यालयातील रेकर्ड तपासले असता रेकर्ड मिळुन येत नाही असे सांगुन त्यानी माझेकडे त्याच्यासाठी व क्लार्क सुहास पवळे यांच्यासाठी मिळुन 5000/- रुपयांची लाच मागणी केली.सदरची लाच रक्कम घेऊन मला दिनांक 08/01/2021 रोजी बोलाविले आहे. लोकसेवक श्री बसु, धनराज कांबळे,क्लार्क सुहास पवळे,खाजगी इसम एजंन्ट अक्षय यांनी 5000/- हजार रुपये नाही दिल्यास ते माझे मित्राचे काम करणार नाहीत व त्याबाबत एनओसी मिळणार नाही अशी माझी खात्री झाली आहे. तरी लोकसेवक श्री बसु, श्री धनराज कांबळे,क्लार्क सुहास पवळे,खाजगी इसम एजंन्ट अक्षय यांच्याशी माझे कोणतेही पुर्ववैमनस्य नाही. त्यानी माझेकडे माझे मित्र श्री निलेश विठठल चौधरी यांनी दि.02/12/2020 रोजी जुनी टोयोटा कंपनीची कम्रीकार एम एच 14 ए व्ही 6189 ही फिनोलेक्स केबल लिमिटेड कंपनीकडुन खरेदी केलेली कार ट्रान्सफर बाबत एनओसी देण्यासाठी माझेकडे 5000/- रुपयांची लाच मागणी केली असुन ती दि.08/01/2021 रोजी घेऊन बोलाविले आहे. त्यामुळे सदर बाबत आपले विभागाकडुन योग्य ती कायदेशिर कारवाई करण्यात यावी. म्हणुन पोलीस निरीक्षक सुनिल बिले ला.प्र.वि.पुणे यांचेकडे लेखी तक्रार दिली. लोकसेवक श्री सुहास पवळे, बसु ,धनराज कांबळे व खाजगी इसम अक्षय यांनी मला दिनांक 08/01/2021 रोजी लाच रक्कम घेऊन बोलाविले असल्याने पडताळणी कारवाई करण्याचे ठरले. त्यावरुन पो.नि.बिले यांनी पडताळणी/सापळा पथक व दोन शासकीय पंच असे पथक तयार केले. त्यावरुन दिनांक 08/01/2021 रोजी 10.00 वाजता लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,पुणे येथील पोलीस निरीक्षक सुनिल बिले यांचे कक्षात मी आलो. सदर ठिकाणी पोलीस निरीक्षक बिले,सापळा पथक व दोन्ही

पंचानी त्यांची मला ओळख करुन दिली. तसेच मी ही माझी ओळख करुन दिली. त्यानंतर मी माझी तक्रार दोन पंच व सापळा पथक यांचेसमोर कथन केली. त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री.सुनिल बिले यांनी माझी दि.07/01/2021 रोजीची लेखी तक्रार पंचास दाखविली. मी कथन केलेली व दि.07/01/2021 रोजीची तक्रार एकच असल्याची पंचाची खात्री झाली. त्यावर पंचानी व पोलीस निरीक्षक बिले यांनी स्वाक्षरी केली आहे. माझे तक्रारीत लाच मागणी असल्याने, पडताळणी/सापळा पथक,दोन शासकीय पंच असे माझे तक्रारीवरुन पंचासह लाचे संदर्भात पडताळणी करण्याचे ठरले. त्यानंतर मला व पंच यांना व्हाईस रेकर्डर बाबत माहिती दिली. सदरचे व्हाईस रेकर्डर मध्ये एक नवीन मेमरीकार्ड इन्सर्ट करण्यात आले. त्यानंतर माझे ,पंच नं.1 श्री. पोंधे व पंच क्र 2 कुदळे यांची निवेदन घेतले.पंच,सापळा पथक,व मला पोलीस निरीक्षक बिले यांनी पडताळणी कारवाईच्या अनुसंगाने योग्य त्या सुचना दिल्या. त्यानंतर मी सापळा पथक व दोन्ही पंच असे शासकीय वाहनाने मध्यवर्ती इमारतीतून 11:19 वा निघून वैरनवी रेसिडन्सी, प्राजित बाय वैरनवी, बिल्ड कम, भोसरी एमआयडीसी,ता.हवेली जि.पुणे येथे 11.50 वा. पोहचलो. त्यावेळी मला, दोन्ही पंचास व सापळा पथकास दिलेल्या सुचनाची पुन्हा उजळनी करुन दिली. त्यानंतर माझे बनियनला व्हाईस रेकर्डर चालू करून लावण्यात आला व मला व पंच क्र. 1 पोंधे यांचेसह लाच मागणी संदर्भात लोकसेवक श्री सुहास पवळे, बसु ,धनराज कांबळे व खाजगी इसम अक्षय यांची पडताळणी करण्यासाठी पायी चालत उप प्रादेशिक परिवहन कार्यालय,मोशी प्राधिकरण,पिंपरी चिंचवड पुणे येथे 12.07 वा रवाना केले. व सर्व सापळा पथक वरुन वैरनवी रेसिडन्सी, प्राजित बाय वैरनवी, बिल्ड कम, भोसरी एमआयडीसी,ता.हवेली जि.पुणे येथे थांबुन राहिले. त्यावरुन मी व पंच पोंधे असे उप प्रादेशिक परिवहन कार्यालय,मोशी प्राधिकरण,पिंपरी चिंचवड पुणे येथे गेलो असता तेथे माझी लोकसेवक सुहास पवळे,धनराज कांबळे व खाजगी इसम अक्षय यांची समक्ष भेट झाली. त्यावेळी धनराज कांबळे यांनी मला लोकसेवक सुहास पवळे यांचेकडे जाण्यास सांगितले. त्यावरुन मी लोकसेवक सुहास पवळे यांची भेट घेतली, त्यावेळी माझे मित्र श्री निलेश विठठल चौधरी यांनी दि.02/12/2020 रोजी जुनी टोयोटा कंपनीची कम्रीकार फिनोलेक्स केबल लिमिटेड कंपनीकडुन खरेदी केली आहे. त्यावरुन सदरची गाडी पिंपरी चिंचवड विभागाकडुन पुणे विभागाकडे वर्ग करण्यासाठी दिलेल्या कागदपत्राची पाहणी करुन त्यांनी संगणकावरुन ऑनलाईन रजिष्ट्रेशन केले. त्यादरम्यान धनराज कांबळे व लोकसेवक सुहास पवळे यांनी माझेकडे कोणत्याही प्रकारची लाचेची मागणी केली नाही. त्यानंतर मी खाजगी इसम अक्षय यांचेकडे गेलो असता त्यांनी माझे तक्रारीतील गाडीच्या ऑनलाईन रजिष्ट्रेशन बाबत माझेशी चर्चा करुन पिं्रन्ट काढुन दिली व नंतर येण्यास सांगितले. त्यावरुन मी परत सापळा पथकाजवळ गेलो व हकीकत सांगितली. त्यावरुन पुन्हा लाच मागणी अनुसंगाने परत पडताळणी करण्याचे सर्वानुमते ठरले. पुन्हा खाजगी इसम एजंन्ट अक्षय याची पडताळणी करण्यासाठी पोलीस निरीक्षक श्री बिले यांनी माझेकडे व्हाईस रेकर्डर देवुन पंच साक्षीदार श्री पोंधे याचंेसह लाचेच्या मागणी संदर्भात पडताळणी करणेसाठी, उप प्रादेशिक परिवहन कार्यालय,मोशी प्राधिकरण,पिंपरी चिंचवडजवळ,प्रिविया बिल्डींगच्या समोर,मोशी प्राधिकरण,पुणे येथे खाजगी इसम एजन्ट अक्षय यांना भेटण्यासाठी पाठविले. त्यावरुन मी व पंच पोंधे उप प्रादेशिक परिवहन कार्यालय,मोशी प्राधिकरण,पिंपरी चिंचवडजवळ,प्रिविया बिल्डींगच्या समोर,मोशी प्राधिकरण,पुणे येथे गेलो असता खाजगी इसम एजन्ट अक्षय हे ओमिनी मोटार कार जवळ भेटले. खाजगी इसम एजन्ट अक्षय व माझेत समक्ष चर्चा झाली. त्यावेळी खाजगी इसम एजन्ट अक्षय यांनी माझे मित्र श्री निलेश विठठल चौधरी यांनी दि.02/12/2020 रोजी जुनी टोयोटा कंपनीची कम्रीकार फिनोलेक्स केबल लिमिटेड कंपनीकडुन खरेदी केली आहे. त्यावरुन सदरची गाडी आरटीओ पिंपरी चिंचवड विभागाकडुन पुणे विभागाकडे वर्ग करण्यासाठी दिलेल्या कागदपत्राबाबतचे काम करण्यासाठी, उप प्रादेशिक परिवहन कार्यालय,मोशी प्राधिकरण, पिंपरी चिंचवड कार्यालयातील ज्यनिअर क्लार्क,सिनिअर क्लार्क,एआरटीओ,मेन आर टीओ आरटीओ आसे पाच टेबलला पैसे दयावे लागतात असे म्हणुन 1300/- रुपयांची लाच मागणी केली आहे. सदरची लाच रक्कम सोमवार दिनांक 11/01/2021 रोजी घेऊन बोलाविले आहे. सदरचे संभाषण पंचासमक्ष व्हईस रेकर्डर मध्ये ध्वनिमुद्रीत करण्यात आले आहे. सदरची लाच मागणी रक्कम दि.11/01/2021 रोजी घेऊन बोलाविले असल्यामुळे पंच व सापळा पथक यांना योग्य त्या सुचना देऊन पो.नि.बिले यांनी तात्पुरती पडताळणी कारवाई स्थगित केली व दिनांक 11/01/2021 रोजी सापळा कारवाई करण्याचे सर्वानुमते ठरले. दिनांक 11/01/2021 रोजी सापळा कारवाई साठी मी दुपारी 15.40 वाजता ओम सिरमिक्स मार्बल समोरील जाधववाडी रोड,मोशी प्राधिकरण,पुणे येथे हजर झालो. त्यावेळी सापळा पथक व पंच हजर झाले. त्यावेळी पंच व सापळा पथक यांनी त्यांची ओळख करुन दिली व मी ही माझी ओळख करुन दिली. त्यानंतर माझे व पंचाचे निवेदन घेतले. त्यानंतर सापळा कारवाईसाठी मी माझ्याकडील रोख रक्कम 1300/- रु. पंचासमक्ष हजर केली. त्यानंतर पोक/2418 रीतेश थरकार यांनी पंचांना त्यांचेकडील अन्थसिन पावडर व अल्ट्रा व्हायोलेट दिवा दाखवुन त्याची माहिती व गुणधर्म सांगुन त्याचे प्रात्याक्षिक करुन दाखविले. मी हजर केलेल्या लाच रकमेच्या नोटांवर पंचासमक्ष अंथ्रासीन पावडर लावून सदर लाच रक्कम माझ्या शर्ट च्या डाव्या खिशात ठेवली. मला, दोन्ही पंचांना आणि सापळा पथकास आवश्यक त्या सुचना दिल्या. खाजगी इसम एजन्ट अक्षय यांनी लाच रकमेचा स्विकार केल्यावर सापळा पथकास पुर्वनियोजित इशारा करण्याबाबत मला सुचना दिली. व उप प्रादेशिक परिवहन कार्यालय,मोशी प्राधिकरण,पिंपरी चिंचवडजवळ,प्रिविया बिल्डींगच्या समोर,मोशी प्राधिकरण,पुणे या ठिकाणी सापळ्याचे नियोजन केले. त्यानंतर पो.नि.बिले यांनी व्हाईस रेकर्डर सुरु करुन माझ्या शर्टचे आतील बाजुस बनियानला सेप्टीपीनने लावला आणि मी व पंच श्री. पोंधे असे आम्ही दोघे माझी मोटार सायकल क्रमांक एम एच 12 टी ए 5826 वरुन खाजगी इसम एजन्ट अक्षय यांना भेटण्यासाठी उप प्रादेशिक परिवहन कार्यालय,मोशी प्राधिकरण,पिंपरी चिंचवडजवळ,प्रिविया बिल्डींगच्या समोर,मोशी प्राधिकरण,पुणे येथील ओमिनी गाडीजवळ आलो. माझे पाठोपाठ सापळा पथक ही आले. त्यानंतर खाजगी इसम एजन्ट अक्षय यांनी माझेशी मोटार कार पिंपरी चिंचवड विभागाकडुन पुणे विभागाकडे वर्ग करण्यासाठीच्या कागदपत्राबाबत चर्चा करुन 1300/- रुपये प्रथम मागणी करुन पुन्हा तडजोडीअंती 1200/- रुपये लाच मागणी करुन खाजगी इसम एजन्ट अक्षय यांनी 1300/- रुपये लाच रक्कम स्विकारली. त्यानंतर मी सापळा पथकास लाच रक्कम स्विकारलेचा पुर्वनियोजीत इशारा केला. त्यावेळी खाजगी इसम एजन्ट अक्षय यांना पंचासमक्ष 16.37 वा. रंगेहाथ पकडले. खाजगी इसम एजन्ट अक्षय यांना त्यांचे पुर्ण नाव पत्ता विचारले असता त्यांनी त्यांचे नाव श्री. अक्षय मारुती माळवे, वय 24 वर्ष, व्यवसाय खाजगी एजन्ट आरटीओ मोशी प्राधिकरण,पुणे रा.ठि. गंगानगर,गणपती मंदीराजवळ,सिसोदिया मार्केट जवळ,आकुर्डी,पुणे मुळ गाव-पळशी,ता.माण,जि.सातारा असे सांगितले. सदरबाबत सविस्तर पंचनामा करणेबाबतची कार्यवाही भोसरी एम.आय.डी.सी पोलीस स्टेशन,पिंपरी चिंचवड आयुक्तालय,पुणे येथे करण्यात आली. एकंदरीत दिनांक 07/01/2021 रोजीच्या माझ्या तक्रारीच्या अनुषंगाने पंचासमक्ष दि.08/01/2021 व दि.11/01/2021 रोजी करण्यात आलेली पडताळणी व सापळा कारवाई दरम्यान घडलेल्या घटना, त्यादरम्यान झालेले प्रत्यक्ष संभाषण तसेच ध्वनीमुद्रीत झालेले संभाषण यावरुन श्री.अक्षय मारुती माळवे, वय 24 वर्ष, व्यवसाय खाजगी एजन्ट आरटीओ मोशी प्राधिकरण,पुणे रा.ठि. गंगानगर,गणपती मंदीराजवळ,सिसोदिया मार्केट जवळ,आकुर्डी,पुणे मुळ गाव-पळशी,ता.माण,जि. सातारा यांनी माझे मित्र श्री निलेश विठठल चौधरी यांनी दि.02/12/2020 रोजी जुनी टोयोटा कंपनीची कम्रीकार फिनोलेक्स केबल लिमिटेड कंपनीकडुन खरेदी केली आहे. त्यावरुन सदरची गाडी आरटीओ पिंपरी चिंचवड विभागाकडुन पुणे विभागाकडे वर्ग करण्यासाठी दिलेल्या कागदपत्राची एनओसी देण्यासाठी श्री.अक्षय मारुती माळवे यांनी माझेवर त्याचा वैयक्तीक प्रभाव पाडुन उप प्रादेशिक परिवहन कार्यालय,मोशी प्राधिकरण,पिंपरी चिंचवड कार्यालयातील, ज्यनिअर क्लार्क,सिनिअर क्लार्क,एआरटीओ, मेन आरटीओ आसे पाच टेबलला पैसे देण्यासाठी म्हणुन तडजोडी अंती 1300/- रुपयांची लाच मागणी करुन दि.11/01/2021 रोजी 16.37 वा. उप प्रादेशिक परिवहन कार्यालय,मोशी

प्राधिकरण,पिंपरी चिंचवडजवळ,प्रिविया बिल्डींगच्या समोर,मोशी प्राधिकरण,पुणे येथील ओमिनी गाडीजवळ सार्वजनीक रस्त्यावर स्विकारुन गुन्हेगारी स्वरूपाचे कृत्य केले म्हणून माझी त्यांचेविरूध्द कायदेशीर फिर्याद आहे.

13.**Action** **Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at**
(केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले): **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव): amol ramesh dere
**Rank** (पद): SI (Sub-Inspector)
**No.**(क्र.): psi **to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):
**District** (जिल्हा):
**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14.**Signature/Thumb impression of the complainant / informant.**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

Mate

15.**Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

खबरची प्रत मिळाली
Mate
12/01/2021

**Signature of Officer in charge, Police Station** (ठाणे प्रभारी अधिका-याची

**Name** (नाव): RAJENDRA PANDURANG KUNT
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): POBN63033

ठाणे अंमलदार
MIDC भोसरी पोलीस स्टेशन